मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 03 फेब्रुवारी 2026 | पान- 1

# पिंपरी-चिंचवड शहराच्या शाश्वत विकासासाठी आम्ही कटिबद्ध!

## भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांची भावना, महापौरपदी रवि लांडगे निश्चित, उपमहापौरपदासाठी शर्मिला बाबर यांचा अर्ज



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराच्या शाश्वत विकासाचा संकल्प घेवून आम्ही काम करीत आहोत. महापालिका निवडणुकीपूर्वी गावकी-भावकीतील मतभेद दूर करुन एकोप्याने शहराच्या विकासात योगदान देण्यासाठी आम्ही पुढाकार घेतला. विधानसभा निवडणुकीत झालेले मतभेद बाजूला ठेवून आम्ही महापालिका निवडणुकीत एकत्रितपणे काम करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी भूमिका भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केली.

पिंपरी- चिंचवड महानगरपालिका महापौरपदासाठी सत्ताधारी भारतीय जनता पार्टीकडून बिनविरोध नगरसेवक रवि लांडगे यांचा अर्ज भरण्यात आला. त्यानंतर उपमहापौरपदासाठी नगरसेविका शर्मिला बाबर यांचा अर्ज दाखल करण्यात आला.

यावेळी सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, चिंचवडचे आमदार शंकर जगताप, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अ‍ॅड. नितीन लांडगे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सदाशिव खाडे, ज्येष्ठ नगरसेविका अनुराधा गोरखे, नगरसेविका नम्रता लोंढे, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, ज्येष्ठ नगरसेवक राजू मिसाळ, दक्षिण भारतीय आघाडीचे प्रमुख राजेश पिल्ले, नगरसेवक अभिषेक बारणे, माजी उपमहापौर केशव घोळवे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रविंद्रजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात सलग दुसऱ्यांदा बिनविरोध निवडून आलेले माझे सहकारी रवि बाबासाहेब लांडगे यांनी पक्षाच्या वतीने "महापौर" पदासाठी अर्ज दाखल केला आहे. भारतीय जनता पार्टीकडे पूर्ण बहुमत आहे. त्यामुळे त्यांची महापौरपदी निवड निश्चित आहे.

> **“ महापालिका महापौरपदी रवि लांडगे, सत्तारुढ पक्षनेतेपदी प्रशांत शितोळे यांची निवड निश्चित झाली आहे. उपमहापौरपदी शर्मिला बाबर यांचा उमेदवारी अर्ज आम्ही भरला आहे. गावकी-भावकी एकत्र राहिली पाहिजे. त्यामाध्यमातून पिंपरी-चिंचवड शहराच्या शाश्वत विकासाचा संकल्प पूर्ण करण्याचा निर्धार करुन आम्ही एकजुटीने काम करणार आहोत. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन आणि पुढील कार्यास शुभेच्छा आहेत."**
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

### कै. अंकुशराव लांडगे, कै. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली..!

**» शहराचे नेते दिवंगत कै. अंकुशराव लांडगे यांच्या विचारांनी आम्ही सर्वजण काम करीत आहोत. आज त्यांच्या कुटुंबातील सदस्याला शहराच्या प्रथम नागरिकपदाचा मान मिळतो आहे. ही खऱ्या अर्थाने अंकुशभाऊंना श्रद्धांजली ठरणार आहे. आगामी काळात पिंपरी-चिंचवड शहरातील प्रत्येक घटकाला न्याय देवून शाश्वत विकासाचे संकल्प पूर्ण करण्यासाठी त्यांच्या माध्यमातून विधायक कार्य होईल, असा मला पूर्ण विश्वास आहे. महाराष्ट्राचे लोकनेते दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अकाली निधनामुळे भारतीय जनता पार्टी महापौर किंवा उपमहापौर निवडीबाबत कोणताही आनंदोत्सव साजरा करणार नाही. त्यामुळे सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी आणि भाजपा परिवारातील सदस्यांनी आनंदोत्सव साजरा न करता दिवंगत अजितदादांना श्रद्धांजली अर्पण करावी, असे अवाहनही आमदार लांडगे यांनी केले आहे.**



---

# अतिक्रमणांमुळे रस्ता अरुंद, साईटपट्ट्या न भरल्याने अपघाताचा धोका

## रस्त्याच्या साइडपट्ट्या तातडीने भरण्याची मागणी वाहन चालकांमधून होत आहे.



**पिंपरी | प्रतिनिधी**

येथील आळंदी रस्त्यावर बनाचा ओढा ते फुगे वस्ती दरम्यानच्या रस्त्याच्या साइडपट्ट्या न भरल्याने हा रस्ता वाहन चालकांसाठी धोकादायक झाला आहे. त्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. या रस्त्याच्या साइडपट्ट्या तातडीने भरण्याची मागणी वाहन चालकांमधून होत आहे.

भोसरीवरून दिघी, वडमुखवाडी, आळंदी, चऱ्होली, बोपखेल, विश्रांतवाडी, येरवडा, पुणे आदी परिसरात ये-जा करण्यासाठी भोसरीतील आळंदी रस्ता हा प्रमुख मार्ग आहे. या रस्त्यावर अगोदरच वेगवेगळ्या प्रकारची अतिक्रमणे झाली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने फेरीवाले, हातगाडीवाले यांच्यासह दुकानदारांचाही समावेश आहे.

> **“ आळंदी रस्त्यावरील बनाच्या ओढ्याजवळील रस्त्याच्या डांबरीकरणावेळी साइडपट्ट्या भरण्यास जागा मालकांद्वारे विरोध करण्यात आला होता. मात्र, पुन्हा या रस्त्याची पाहणी करून त्या भरण्यात येतील.**
>
> **- शिवराज वाडकर, कार्यकारी अभियंता (स्थापत्य विभाग), इ क्षेत्रीय कार्यालय**

त्यामुळे या रस्त्यावर वाहनांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. तसेच अनेकदा वाहतूक कोंडीही होत असते. अतिक्रमणांमुळे रस्ता अरुंद झाला असताना रस्त्याच्या काही भागांतील साइडपट्ट्या धोकादायक ठरत आहेत.

त्या न भरल्याने रस्त्याच्याकडेला काही ठिकाणी एक ते दीड फुटाची चर पडली आहे. त्यामुळे हा रस्ता वाहनचालक आणि पादचाऱ्यांसाठी धोकादायक झाला आहे. या रस्त्याची साइडपट्टी तातडीने भरण्याची मागणी वाहनचालकांमधून होत आहे.

# शहराच्या प्रगतीची घोडदौड महापौर कायम ठेवतील : आमदार शंकर जगताप

## महापौरपदासाठी रवि लांडगे, उपमहापौरपदासाठी शर्मिला बाबर यांचे उमेदवारी अर्ज दाखल

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरासाठी भाजपच्या वतीने रवी लांडगे यांना उमेदवारी देण्यात आले आहे. महापौर म्हणून रवी लांडगे यांच्या माध्यमातून महापालिकेच्या सभागृहातून शहरासाठी सर्वंकष विकासाचे निर्णय होतील आणि शहराच्या प्रगतीची घोडदौड कायम राखली जाईल असा विश्वास निवडणूक प्रचार प्रमुख तथा आमदार शंकर जगताप यांनी सोमवारी व्यक्त केला.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने पिंपरी चिंचवड शहराच्या महापौर पदासाठी रवी लांडगे आणि उपमहापौर पदासाठी शर्मिला बाबर यांचे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. यावेळी सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, भोसरीचे आमदार महेश लांडगे, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे, अमित गोरखे, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सदाशिव खाडे, ज्येष्ठ नगरसेविका अनुराधा गोरखे, नगरसेविका नम्रता लोंढे, ज्येष्ठ नगरसेवक राजू मिसाळ, नगरसेवक अभिषेक बारणे, माजी उपमहापौर केशव घोळवे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### याबाबत आमदार शंकर जगताप म्हणाले,

» पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीमध्ये भाजपला शहरातून घवघवीत यश मिळाले. नागरिकांनी भाजपवर एक हाती विश्वास सोपवला आहे. हा विश्वास पूर्ण करण्याची जबाबदारी आता प्रत्येक नगरसेवकाची आहे. "जबाबदार पालक" या नात्याने प्रत्येक नगरसेवक आता काम करणार आहे. भाजपचे शिस्त, संघटन आणि साधनसुचिता या सर्व गोष्टींचे पालन करण्यासाठी महापालिकेचे सभागृह हे अंतिम असेल. या सभागृहातून शहराच्या विकासाला दिशा देण्याचे काम आगामी काळात महापौर म्हणून रवी लांडगे करतील असा विश्वास असल्याचे आमदार जगताप म्हणाले.

> राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रदेशाध्यक्ष रविंद्रजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनानुसार नगरसेवक रवि बाबासाहेब लांडगे यांनी पक्षाच्या वतीने "महापौर" पदासाठी अर्ज दाखल केला आहे. तर उपमहापौर पदासाठी शर्मिलाताई बाबर यांचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. पिंपरी चिंचवड शहरामध्ये भाजपच्या माध्यमातून आरोग्य, शिक्षण, क्रीडा, पाणी व्यवस्थापन आणि सेवा क्षेत्राच्या बाबतीत सर्वंकष विकास केला जात आहे. विकासाची ही घोडदौड कायम राखण्यासाठी महापालिका सभागृह हे अंतिम असणार आहे. सभागृहातील निर्णय नागरिकांच्या सेवेसाठी आणि सुविधेसाठी घेतले जातील. हा विश्वास महापौर या नात्याने रवी लांडगे आणि, उपमहापौर म्हणून शर्मिला बाबर ठामपणे सार्थ ठरवतील.
>
> - शंकर जगताप , आमदार, पिंपरी चिंचवड शहर

# तळेगाव दाभाडेतील आठवडे बाजार नागरिकांसाठी ठरत आहे डोकेदुखी

## वाहतूक कोंडी, ध्वनी प्रदूषण व वाढती गुन्हेगारी; प्रशासनाच्या दुर्लक्षावर नागरिकांचा संताप

**पिंपरी | प्रतिनिधी**

तळेगाव दाभाडे येथे रविवारी आठवडे बाजार भरतो. यामुळे स्थानिक नागरिकांसह आजूबाजूच्या गावांना आणि वाडी वस्तीवरील नागरिकांना खरेदी विक्रीसाठी बाजारपेठ मिळत आहे. परंतु या बाजारपेठेतील समस्यांकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने दिवसेंदिवस येथील बाजार नागरिकांची डोकेदुखी ठरू लागला आहे.

या आठवडे बाजाराचे दिवसेंदिवस वाढते स्वरूप व त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी, ध्वनी प्रदूषण व पाकीटमार, मोबाईल चोर, यासारखी वाढती गुन्हेगारी यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. स्थानिक नागरिक व व्यापारी वर्ग यांनी या आठवडे बाजाराच्या ढिसाळ नियोजना संदर्भात प्रशासनास दोषी ठरवले आहे. आठवडे बाजाराचे स्वरूप पूर्णपणे पालटले आहे. राजेंद्र चौक, डाळ आळी, श्री शिवाजी टॉकीज, जिजामाता चौक, मारुती मंदिर चौक, जुन्या नगरपालिका इमारतीच्या पुढील व मागील बाजूस ते थेट जिजामाता चौक ते स्टेशन भागाला जोडणाऱ्या रस्त्याच्या दुतर्फा, स्वामी विवेकानंद शाळेसमोर अशा सर्व ठिकाणी हा बाजार भरत आहे. स्वामी विवेकानंद शाळा ते संपूर्ण गाव परिसर हा वाहतुकीच्या समस्येने त्रस्त झाला आहे. या बाजारा संदर्भात प्रशासनाकडून कुठल्याच प्रकारचे नियोजन करण्यात येत नाही. असा थेट आरोप नागरिकांकडून व स्थानिक व्यापाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

या संदर्भात एप्रिल 2025 मध्ये व्यापारी, फेरीवाले संघटना, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व नागरिक यांची तळेगाव दाभाडे नगरपरिषद येथे अधिकारी व कर्मचारी तसेच पोलीस प्रशासन, वाहतूक पोलीस यांच्यासोबत दोन ते तीन वेळा संयुक्त बैठका पार पडल्या. व या बैठकांनंतर तळेगाव दाभाडे नगरपरिषद व पोलीस प्रशासन यांनी संयुक्तिकरित्या प्राप्त तक्रारींवर आम्ही लवकरच उपाययोजना करू, असे आश्वासन दिले. त्यानंतर पुढील दोन आठवडे याची अंमलबजावणीही झाली. जिजामाता चौकाकडून गावात जाणारा रस्ता मोकळा ठेवणे, जुनी नगरपालिका ते संभाजीनगरकडे जाणाऱ्या रस्त्यालगत व्यावसायिकांना मज्जाव करणे जेणेकरून गावात येण्या जाण्यासाठी प्रत्येकी एक रस्ता मोकळा राहील. मारुती मंदिर चौक ते जिजामाता चौक हा रस्ताही मोकळा ठेवण्यात येईल जेणेकरून वाहतुकीला अडथळा येणार नाही, सर्व वाहतूक सुरळीत होईल.



### नागरिकांच्या मागणीला केराची टोपली

» बाजाराची विस्कळीत अवस्था वाहतूक कोंडी, ध्वनी प्रदूषण व वाढती गुन्हेगारी याला प्रशासनच खतपाणी घालत असल्याचे स्थानिकांकडून बोलले जात आहे. या संदर्भात मागील सात ते आठ महिन्यांपासून व्यापारी वर्ग व नागरिक प्रशासनाकडे सतत पाठपुरावा करीत आहेत. परंतु अद्याप नागरिकांच्या मागणीकडे प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्याचे सांगण्यात येत आहे.

> या संदर्भात नऊ महिन्यांपूर्वी प्रशासनासोबत झालेल्या बैठकांमध्ये ठरल्याप्रमाणे रोजचे भाजीपाला विक्रेते यांना जुन्या मार्केटमध्ये जागा उपलब्ध करून द्यावी. जेणेकरून रोजच्या वाहतूक कोंडीतून सुटका होईल. तसेच आठवडे बाजार श्री शिवाजी टॉकीज ते राजेंद्र चौक व राजेंद्र चौक ते डाळी चौक या परिसरात सोय केल्याने गावातील प्रमुख चौकांची वाहतूक कोंडीतून सुटका होईल. पोलिस प्रशासनाने मिरवणुकांवेळी बाजारपेठेत उभ्या असलेल्या गाड्यांचे फोटो काढून पावत्या पाठवतात तेवढ्याच तत्परतेने उपाययोजना केल्यास वाढती गुन्हेगारी व वाहतूक कोंडीस आळा बसेल.
>
> - किरण ओसवाल, सामाजिक कार्यकर्ते

> तळेगाव दाभाडे शहरातील ऐतिहासिक बाजारपेठेत असलेला हा आठवडे बाजार तळेगाव दाभाडे शहराची शान आहे. परंतु अलीकडच्या काळात या बाजाराला आलेले स्वरूप पाहता त्वरित उपाययोजनांची गरज आहे. या संदर्भात प्रशासनाला वारंवार विनंती करून देखील यावर कुठलीच उपाययोजना करण्यात येत नाही. त्यामुळे वाहतूक कोंडी सारख्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.
>
> - विनोद राठोड, ज्वेलर्स असोसिएशन

# भाजपमध्ये महापौरसह विषय समित्यांच्या अध्यक्षपदासाठी चुरस

## इच्छुकांची नावे कोअर कमिटी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे या नावांवर चव्हाण यांच्यासह मुख्यमंत्री फडणवीस अंतिम निर्णय घेणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणेकरांनी भाजपला स्पष्ट बहुमत दिल्याने महापौर, स्थायीसह इतर विषय समित्यांच्या अध्यक्षपदासाठी इच्छुकांनी फिल्डिंग लावली असून या पदांसाठी चुरस निर्माण झाली आहे. दुसरीकडे महापालिकेतील भाजपच्या गट नेतेपदी ज्येष्ठ व अनुभवी नगरसेवक गणेश बिडकर यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. त्यामुळे महापालिकेच्या सभागृह नेतेपदाची माळ पुन्हा एकदा बिडकर यांच्या गळ्यात पडण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

महापालिका निवडणुकीत भाजपचे ११९ नगरसेवक निवडून आले आहेत. शहराचे महापौरपद सर्वसाधारण गटातील महिलेसाठी राखीव झाले असून नवीन महापौर आणि उपमहापौर यांची निवड ९ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच भाजपच्या नवनियुक्त नगरसेवकांची बैठक झाली. या बैठकीमध्ये महापौर, उपमहापौर, सभागृहनेता, स्थायी समिती अध्यक्ष व इतर पदांबाबत प्राथमिक चर्चा झाली. या चर्चेच्या माध्यमातून कोणत्या पदासाठी कोण इच्छुक आहे, याचा अंदाज घेण्यात आला. इच्छुकांची नावे कोअर कमिटी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे पाठविली होती. या नावांवर चव्हाण यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अंतिम निर्णय घेणार आहे.

दरम्यान, भाजपच्या गट नेतेपदी पक्षाचे ज्येष्ठ नगरसेवक गणेश बिडकर यांची नियुक्ती करण्यात आली असून याबाबतचे पत्र भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे पत्र महापालिका आयुक्त आणि विभागीय आयुक्तांना देण्यात आले आहे. त्यामुळे बिडकर हे पुन्हा एकदा सभागृहनेते होण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. बिडकर हे सर्वांत अनुभवी नगरसेवक असून, ते पाचव्यांदा महापालिका सभागृहात पोहोचले आहेत. बिडकर यांनी यापूर्वी शहर सुधारणा समिती, स्थायी समितीचे अध्यक्षपदासह सभागृह नेतेपदही सांभाळले आहे. त्या अनुभवाच्या जोरावर त्यांना पुन्हा संधी देण्यात आल्याची चर्चा आहे.




### रिपाइंच्या स्वतंत्र गटाची नोंदणी होणार का?

» महापालिकेच्या २०१७ च्या निवडणुकीमध्ये भाजप आणि आठवले गटाच्या रिपाइंने युती केली होती. रिपाइंचे उमेदवार भाजपच्या कमळ चिन्हावर निवडणूक लढले होते. निवडणुकीमध्ये रिपाइंच्या जिंकलेल्या नगरसेवकांच्या गटाची विभागीय आयुक्तांकडे स्वतंत्र गटनोंदणी करण्यात आली होती. त्यानंतर भाजपने रिपाइंला उपमहापौरपद दिले होते. यंदाच्या महापालिका निवडणुकीमध्येही भाजप व रिपाइं एकत्र लढले. रिपाइंचे उमेदवार कमळ या चिन्हावरच लढले. आता निवडून आलेल्यांची स्वतंत्र गटनोंदणी करून उपमहापौरपद देण्याची मागणी रिपाइंकडून केली जात आहे. मात्र, भाजपने विभागीय आयुक्त व महापालिका आयुक्तांना दिलेल्या पत्रामध्ये भाजप व रिपाइंच्या सर्व ११९ नगरसेवकांच्या गट नोंदणीचा उल्लेख आहे. त्यामुळे रिपाइंच्या स्वतंत्र गटाची नोंदणी होणार का? याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे.

### भाजपमध्ये इतर पदांसाठी होणार चुरस !

» सत्ताधारी भाजपने बिडकर यांची पक्षाचा गटनेता म्हणून निवड झाल्याने सभागृह नेतेपदाचा प्रश्न निकाली निघाला आहे. मात्र, महापालिकेतील महापौर, उपमहापौर, स्थायी समिती अध्यक्ष व इतर विषय समित्यांच्या अध्यक्षपदांसाठी चुरस निर्माण झाली असून इच्छुकांकडून वरिष्ठांकडे फिल्डिंग लावण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

### पदांबाबत प्राथमिक चर्चा

» केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच भाजपच्या नवनियुक्त नगरसेवकांची बैठक झाली. या बैठकीमध्ये महापौर, उपमहापौर, सभागृहनेता, स्थायी समिती अध्यक्ष व इतर पदांबाबत प्राथमिक चर्चा झाली. या चर्चेच्या माध्यमातून कोणत्या पदासाठी कोण इच्छुक आहे, याचा अंदाज घेण्यात आला. इच्छुकांची नावे कोअर कमिटी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे पाठविली होती. या नावांवर चव्हाण यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अंतिम निर्णय घेणार आहे.


# आयटी कंपन्यांना मोठा दिलासा... या मार्गावरील मेट्रोला गती

## महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या (महामेट्रो) दुसऱ्या टप्प्यातील रामवाडी ते वाघोली मेट्रो विस्तारीकरण प्रकल्पाला गती मिळाली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या (महामेट्रो) दुसऱ्या टप्प्यातील रामवाडी ते वाघोली मेट्रो विस्तारीकरण प्रकल्पाला गती मिळाली आहे. महामेट्रोने प्रकल्पासाठी निविदा मागविण्यास सुरुवात केली आहे. ही प्रक्रिया पार पाडल्यानंतर साडेतीन वर्षांत मेट्रो प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यामुळे खराडी, विमाननगर परिसरातील आयटी कंपन्यांना तसेच या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

पुणे-अहिल्यानगर रस्ते मार्गावरील विमाननगर, खराडी, वाघोली या परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. पूर्वेकडून शहराकडे ये-जा करणारी वाहतूक मंद गतीने होत असून, प्रामुख्याने याचा फटका पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर जाणाऱ्या हवाई प्रवाशांना बसत आहे. त्या पार्श्वभूमीवर रामवाडीपासून पुढील मेट्रो मार्ग वाघोलीपर्यंत विस्तार करावा, अशी मागणी करण्यात येत होती. महामेट्रोने दीड वर्षांपूर्वी तीन हजार ६२४ कोटी रुपयांच्या तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालाला राज्य आणि अखेर केंद्र सरकारकडून मंजुरी देण्यात आली. मात्र, मधल्या काळात या मार्गावरच सहा पदरी उन्नत रस्ते मार्ग प्रस्तावित करण्यात आला. राज्य मंत्रिमंडळाने एमएसआयडीसी अंतर्गत हा रस्ते प्रकल्प करण्याचे निश्चित केल्याने महामेट्रोच्या विस्ताराचा मार्ग मोकळा झाला. दरम्यानच्या काळात पंचायत समिती, नगरपरिषदा आणि महानगरपालिका निवडणुकांच्या आचारसंहितेमुळे निविदा प्रक्रिया थांबविण्यात आली होती, असे स्पष्टीकरण महामेट्रोकडून देण्यात आले.



### मार्गिकेचे काम आणि स्थानकेश

» महामेट्रोच्या विस्तारीत प्रकल्पानुसार पहिल्या टप्प्यात रामवाडी ते तुळजाभवानीपर्यंतचा ४.८ किलोमीटर आणि दुसऱ्या टप्प्यात आणि ४.७ किलोमीटर अंतर उन्नत रस्त्याचा समावेश आहे. यामध्ये चार स्थानकांचे बांधकाम आणि ये-जा करण्याचा मार्ग (रॅम्प) यांचा समावेश आहे. विमाननगर, सोमनाथ नगर, खराडी बायपास, तुळजाभवानी मार्ग, उबाळेनगर, अप्पर खराडी रस्ता, वाघेश्वर मंदिर, वाघोली, सिद्धार्थ नगर, बकोरी फाटा आणि विठ्ठलवाडी अशी स्थानके प्रस्तावित आहेत.

> महामेट्रोने या पहिल्या टप्प्याच्या कामासाठी निविदा मागवल्या असून, ४ मार्चपर्यंत निविदेची अंतिम मुदत आहे. ही प्रक्रिया पार पाडल्यानंतर पुढील साडेतीन वर्षांत प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. या मेट्रो विस्तारामुळे विमाननगर, खराडी, वाघोली या मार्गावर वाहतूक कोंडीपासून नागरिकांना दिलासा मिळेल
>
> \- चंद्रशेखर तांबवेकर, जनसंपर्क अधिकारी, महामेट्रो

# अवघ्या दहा महिन्यात 17 कोटी दंड वसूल...

## वाहतूक पोलिस आणि उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) बेशिस्त वाहनधारकांवर कारवाईचा बडगा




**पुणे | प्रतिनिधी**

वाहतूक पोलिस आणि उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) बेशिस्त वाहनधारकांवर कारवाईचा बडगा उगारला जात असूनही प्रमाण कमी होण्यास तयार नसल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे.

बेशिस्त वाहनचालकांमुळे पादचाऱ्यांसह एकूणच वाहतूक व्यवस्थेसमोर अनेक आव्हाने आहेत. आरटीओ, वाहतूक पोलिस यांच्यासह शासकीय स्तरावर ही बेशिस्त थांबविण्यासाठी प्रयत्न होत असले तरी शहरातील अशा वाहनचालकांना रोखण्यात यश येत नाही. प्रादेशिक परिवहन कार्यालय पुणे (आरटीओच्या) फ्लाइंग स्क्वॉडने नोंदवलेल्या गुन्ह्यांच्या आकडेवारीकडे नजर टाकली तर सन ०१ एप्रिल २०२५ ते ०५ जानेवारी २०२६ या कालावधीत, तब्बल ६० हजार ७२१ बेशिस्त वाहन चालकावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. वाहतूक नियमांचे भंग करण्यात सर्वाधिक प्रमाणात हेल्मेट न घालणाऱ्यांवर कारवाई झाली आहे. हेल्मेट न घालणे (१३,०७८ प्रकरणे) आणि पीयूसी (७७४२ प्रकरणे) अशा ४९ विविध प्रकारच्या नियमांचे उल्लंघन केल्या प्रकरणी आरटीओकडून दंडात्मक करवाई करत १७ कोटी १८ लाख २३ हजार दंड वसूल करण्यात आला आहे.

वेगमर्यादा ओलांडणे, हेल्मेट न घालणे, सीट बेल्ट न वापरणे, अवैध विमा, सिग्नल तोडणे, चुकीचे पार्किंग, जास्त भार वाहतूक, गाडी चालवताना मोबाईल वापरणे, रिफ्लेक्टरशिवाय वाहन, टेल लॅम्प/ब्रेक लाइट निकामी, फॅन्सी नंबर प्लेट अशा अनेक प्रकारच्या गुन्ह्यांचा समावेश आहे. बेशिस्त वाहनचालक आपल्यासह इतरांच्या जीवाचीही पर्वा करीत नसल्याचे आरटीओ अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

वाहतूक पोलिस आणि उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) बेशिस्त वाहनधारकांवर कारवाईचा बडगा उगारला जात असूनही प्रमाण कमी होण्यास तयार नसल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे.

### १ एप्रिल २०२५ ते ५ जानेवारी २०२६ पर्यंत करण्यात आलेली दंडात्मक कारवाई

» एप्रिल – १ करोड ५२ लाख ४० हजार » मे १ – करोड ७८ लाख ९८ हजार » जुन – १ करोड ७३ लाख ९९ हजार » जुलै – १ करोड ७१ लाख ६५ हजार » ऑगस्ट – १ करोड ५७ लाख ३५ हजार » सप्टेंबर – १ करोड ७१ लाख २१ हजार » ऑक्टोबर – १ करोड ६४ लाख ०५ हजार » नोव्हेंबर – १ करोड ८५ लाख ४८ हजार » डिसेंबर – १ करोड ८१ लाख ५८ हजार » जानेवारी – १ करोड ८१ लाख ५८ हजार » एकूण – १७ करोड १८ लाख २३ हजार

### अशी आहे करवाई

- » स्पीड गन (अतिवेग) – २३४१
- » विना हेल्मेट – १३०७८
- » सीट बेल्ट – १०२
- » अवैध विमा – ६४०१
- » एमडीएल – २९०४
- » परवाना – १६८५
- » पीयूसी – ७७४२
- » फिटनेस – ५५०३
- » सिग्नल जंपिंग – ४२०
- » चुकीच्या ठिकाणी पार्किंग – ६८०
- » विरुद्ध दिशेने वाहनचालन – ८९६
- » ओव्हरलोड मालवाहतूक – ११४९
- » मोबाईलचा वापर – १७८३
- » रिफ्लेक्टर नसलेले – ३६८१

> “ आरटीओ काय करणार? सार्वजनिक वाहतुकीचे नियम सर्वांनी पाळावे, नियम हे कोणावरती बंधने नसून ते आपले कर्तव्य आहे. वाहन चालविताना मोबाईलवर बोलणे, ट्रिपल सीट, विरुद्ध दिशेने जाणे या बाबी स्वतःसाठी आणि इतरांसाठीही धोकादायक आहेत. हा केवळ दंडात्मक कारवाईचा विषय नाही, तर आयुष्याच्या सुरक्षिततेचा प्रश्न आहे. प्रत्येकाने स्वतःहून वाहतूक नियमांचे पालन करणे गरजेचे आहे.
>
> - स्वप्निल भोसले, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी

# प्रवास होणार सुकर..! पुणे-मुंबई, पुणे-हैदराबाद हायस्पीड रेल्वे मार्ग

## हायस्पीड रेल्वे मार्ग भारतीय हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे.



**पुणे | प्रतिनिधी**

मुंबई-पुणे आणि पुणे-हैदराबाद या दोन महत्त्वाच्या शहरांदरम्यान हायस्पीड रेल्वे (बुलेट ट्रेन/सेमी हायस्पीड) रेल्वे कॉरिडॉर बनवणार असल्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी रविवारी सादर केलेल्या अंदाजपत्रकात केली. या दोन प्रकल्पांमुळे रेल्वे प्रवासाचा वेळ कमी होणार असून, दळणवळणाचा वेग वाढणार आहे. यामुळे आयटी, उद्योग, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्राशी संबंधित प्रवाशांना मोठा फायदा होणार असून, हायस्पीड मार्गामुळे पुणे-मुंबई दरम्यानचे अंतर केवळ एक ते सव्वा तासात गाठता येणार आहे.

हायस्पीड रेल्वे मार्ग भारतीय हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. पुणे-मुंबईदरम्यान सध्या रेल्वे किंवा रस्तेमार्गे प्रवासासाठी सुमारे ४ ते ५ तास लागतात. प्रस्तावित हायस्पीड रेल्वेमुळे हा प्रवास अवघ्या एक ते सव्वा तासांत होऊ शकतो. तसेच पुणे ते हैदराबाददरम्यान रेल्वे प्रवासाला आठ ते दहा तास वेळ लागतो. हायस्पीड रेल्वे मार्ग झाल्यावर चार ते साडेचार तासांत प्रवास होण्याची शक्यता आहे. पुणे ते हैदराबाद मार्गामुळे महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगणा या तीन राज्यांमधील औद्योगिक, व्यापारी व्यवसायाला चालना मिळणार आहे. या रेल्वेसाठी स्वतंत्र लोहमार्ग टाकण्यात येणार आहे. केंद्राकडून मंजुरी मिळाल्यामुळे या प्रकल्पासाठी मार्गाची पाहणी, तांत्रिक अभ्यासाच्या आढावाला गती मिळणार आहे. या दोन मार्गासह इतर पाच हायस्पीड मार्गांची घोषणा झाल्यामुळे आराखड्यास (डीपीआर) तयार करण्यासाठी लवकरच ग्रीन सिग्नल मिळेल.

### हायस्पीड रेल्वे प्रकल्पाचे संभाव्य फायदे

- » पुणे-मुंबई प्रवासाचा वेळ ३ ते ४ तासांवरून एक ते दीड तासापर्यंत कमी होणार
- » पुणे-हैदराबाद प्रवासाचा वेळ ८ ते ९ तासांवरून ४ ते ५ तासांपर्यंत घट
- » उद्योग, आयटी, शिक्षण व आरोग्य क्षेत्राला मोठा लाभ
- » पर्यावरणपूरक वाहतूक व कार्बन उत्सर्जनात घट
- » रस्ते व विमान प्रवासावरील ताण कमी होणार

### प्रकल्पाच्या ठळक बाबी...

- » भारतीय हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प
- » रेल्वेचा वेग - २२० ते ३५०
- » पुणे-हैदराबाद अंतर - ५५६
- » महाराष्ट्राबरोबर कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातून मार्ग जाणार
- » प्रमुख शहर - पुणे, सोलापूर, वाडी